# प्रसिध्दी निवेदन

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) इ. ८ वी साठी परीक्षा दि. ०८ डिसेंबर २०१९

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे- १ मार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) इ. ८ वी साठी परीक्षा रविवार दि. ०८ डिसेंबर २०१९ रोजी महाराष्ट्रात एकूण **३७७** केंद्रावर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी महाराष्ट्रातून एकूण **८,४६६** शाळा व एकूण **१,३०,०६३** विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

शाळांना परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscepune.in व http://nmms.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर **दि. १५ नोव्हेंबर २०१९** पासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

सदर प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांस काढून देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची असेल. प्रवेशपत्राबाबत मुख्याध्यापकांना/पालकांना/विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास त्यांनी संबंधित परीक्षा केंद्रसंचालक / शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांचेशी संपर्क साधावा.

| कार्यालयाचा पत्ता | ईमेल | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे- ४११ ००१. | nmms.msce@gmail.com | ०२०-२६१२३०६६ / ०२०-२६१२३०६७ |

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

दिनांक :15 /११/२०१९